


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । सोमवार, दि. २१ ऑक्टोबर २०२४ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : २४ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने १२




# यहाँ के हम हैं सिकंदर !



## बापू, मालक, दादा फिरसे! अवताडे वेटिंगवर, सातपुते 'राम'भरोसे!



✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**भाजपच्या पहिल्या यादीत सुभाष देशमुख (दक्षिण), विजयकुमार देशमुख (उत्तर) आणि सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) या तिघां विद्यमान आमदारांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाले, मात्र विद्यमान आमदार समाधान अवताडे (मंगळवेढा-पंढरपूर) व राम सातपुते (माळशिरस) यांच्या उमेदवारीचा सस्पेन्स कायम राहिला आहे.**

अपेक्षेप्रमाणे विधानसभेची ९९ जणांची पहिली यादी भाजपच्यावतीने दिल्लीतून रविवारी (ता. २०) जाहीर करण्यात आली. आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पुन्हा निवडून येण्याच्या क्षमतेवर पक्षानं विश्वास ठेवून उमेदवारीची वरमाला पुन्हा त्यांच्या गळ्यात घातली आहे.

विशेषत्वे, उमेदवारीच्या अनुषंगषाने, सोलापूर जिल्ह्यातील भाजपच्या ताब्यात असलेल्या विधानसभा मतदार संघांचा सर्व्हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघांच्यावतीने करण्यात आला होता. या सर्व्हेमध्ये आमदार विजयकुमार देशमुख,आमदार सुभाष देशमुख आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याबद्दल निवडून येण्याच्या कसोटीवर सकारात्मक वातावरण असल्याची माहिती सर्व्हेतून पुढं आली होती. भाजप आणि संघ यांच्या सर्व्हे आधारे पक्षानं या तिघा विद्यमान आमदारांच्या नावावर उमेदवारीची मोहर उमटवली आहे.

### अवताडे वेटिंगवर!

भाजपनं अपेक्षित विद्यमान आमदारांसह काही वजनदार इच्छुकांची पहिली ९९ जणांची जी यादी रविवारी घोषित केली. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील तिघा आमदारांच्या उमेदवारीवर पुन्हा शिक्कामोर्तब करताना पंढरपूरचे आमदार समाधान अवताडे यांना या यादीत स्थान दिलेले नाही. प्रशांत परिचारक यांच्यामुळे समाधान अवताडे यांचे नाव पहिल्या यादीत येऊ शकले नाही, अशी शक्यता भाजपच्या वरिष्ठ नेत्याने व्यक्त केली. परिचारक आणि अवताडे यांच्यापैकी कोणाला उमेदवारी द्यायची, घोळ आहे, त्यामुळे अवताडे यांना पहिल्या यादीतून वगळले असावे, असा अंदाजही बांधला जात आहे.

### आता प्रतिक्षा प्रतिस्पर्धी उमेदवाराची


दक्षिण सोलापूर मतदार संघातून भाजपतर्फे आमदार सुभाष देशमुखांना उमेदवारी मिळाल्यानंतर त्यांची फाईट कोणाशी होणार? याबद्दलचे औत्सुक वाढले आहे. दिलीप माने, सुरेश हसापुरे, महादेव कोगनुरे आदीजण काँग्रेस पर्यायानं महाविकास आघाडीकडून लढण्यासाठी इच्छुक आहेत. तर धर्मराज काडादी यांनी राष्ट्रवादीच्यावतीने मोर्चेबांधणी सुरु ठेवली आहे. तथापि, आमदार सुभाष देशमुख यांच्याविरुद्ध कोणता चेहरा आखाड्यात असणार, शिवसेनेच्यावतीने अमर पाटील इच्छुक आहेत, त्यांच्याबाबतीत कोण होणार? याची चर्चा आता पुन्हा रंगली आहे.

### ॲड. थोबडे अपक्ष राहणार का?

ॲड.मिलींद थोबडे हे सोलापूर शहर उत्तर विधानसभेच्या आखड्यातून इच्छुक आहेत. भाजपकडून उमेदवारी मिळविण्यासाठी त्यांनी खास प्रयत्न केले होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सेटींग लावली होती. मात्र भाजपची उमेदवारी विजयकुमार देशमुख यांना मिळाली. ॲड. थोबडे आता अपक्ष निवडणूक लढणार का? हा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित झाला आहे.

### सातपुतेंची उमेदवारी 'राम'भरोसे

माळशिरसचे भाजपचे विद्यमान आमदार राम सातपुते यांना दुसऱ्यांदा भाजपकडून आखाड्यात उतरवले जाणार अशी चर्चा आहे. ते इच्छुक असल्याचं कळतं. मात्र भाजपनं जी पहिली यादी जाहीर केली आहे. ज्या यादीत विद्यमान आमदारांचा समावेश आहे. त्यामध्ये माळशिरसचे आमदार राम सातपुते यांचे नाव नाही. त्यांना वेटिंग ठेवले आहे की त्यांची उमेदवारीच 'रामभरोसे' आहे. याबद्दलची चर्चा भाजपची यादी घोषित झाल्यानंतर सुरु झाली आहे. विशेषत्वे, आमदार सातपुते हे सोलापूर लोकसभेची निवडणूक झाल्यापासून माळशिरस विधानसभेच्या मतदार संघात कोठेच ॲक्टीव्ह दिसत नाहीत. त्यामुळे त्यांच्या उमेदवारीबद्दल अधिक संभ्रम वाढल आहे.



भाजपच्या नेतृत्त्वानं माझ्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मला तिसऱ्यांदा उमेदवारी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो. लोकशाहीमध्ये उमेदवारी मिळण्यासंबंधीची महत्त्वाकांक्षा असणे सहाजीकच आहे. इच्छुक सर्वजण पक्षाचा उमेदवार म्हणून माझं काम करतील, यामध्ये शंका नाही. माझ्यापुढे उमेदवार कोण? याला महत्त्व नाही. मी विकासाचं व्हिजन घेऊन मतदारांपुढे जाणं महत्त्वाचं आहे. राज्यात महायुतीचं सरकार पुन्हा येणार आहे. सोलापूर शहर दक्षिण मतदार संघात आम्ही विजय नक्की घेणार.

- **सुभाष देशमुख**, आमदार, सोलापूर शहर दक्षिण मतदार संघ



मतदार संघातील मतदारांच्या भक्कम आधारामुळेच पुन्हा उमेदवारी मिळाली. कार्यकर्त्यांचं संघटन अन् काम यामुळे मी उमेदवारीपर्यंत पोचलो. पक्षामधील सर्वांना सोबत घेऊन महायुतीच्या झेंड्याखाली निवडणूक लढवू. निवडणूक लढविण्यासंबंधी पक्षाकडं इच्छा व्यक्त करणं काहीच गैर नाही. उमेदवारीवरुन कोणी नाराज राहणार नाही. कोणाची नाराजी असेल तर ती दुर करु. आपल्या कर्तृत्वावर, एकनिष्ठपणावर विश्वास ठेवून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व संबंधितांनी उमेदवारी देऊन पुन्हा लढण्याची संधी दिली. त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. या मतदार संघात पुन्हा भाजपचं 'कमळ'चं फुलणार आहे.

- **विजयकुमार देशमुख**, आमदार सोलापूर शहर उत्तर



भारतीय जनता पक्ष–महायुतीच्यावतीने अक्कलकोट विधानसभेसाठी मला उमेदवारी देण्यात आलेली आहे. माझ्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून उमेदवारी दिल्याबद्दल भारतीय जनता पार्टीचे मनापासून आभार मानतो.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आभार मानतो.

-**सचिन कल्याणशेट्टी**, आमदार अक्कलकोट

## सांगोल्यात काकांचा डाव; चीत भी मेरी और पट भी मेरी!

✔ सोलापूर/प्रतिनिधी



दीपकआबा साळुंखे डॉ.बाबासाहेब देशमुख डॉ.अनिकेत देशमुख

राजकीय पटल आणि सत्तेच्या सारीपाटावर डाव अन् प्रतिडाव टाकणं हे सर्वश्रुत आहे. पण टाकलेला डाव किती यशस्वी होतो, याला तसं महत्त्व. महाराष्ट्राच्या राजकारणातील भीष्म शरद पवार यांचं डाव टाकणं म्हणजे तसं भयावहच. पवारांनी टाकलेल्या डावांवर अनेकजण राजकारणात 'क्लीन बोल्ड'सुद्धा झाले, हेदेखील तितकचं खरं. डाव टाकण्यात माहिर असलेल्या शरद पवारांनी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, स्वत:च्या शरदचंद्र पवार गटाकडं खेचून घेतलेल्या मतदार संघासह काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटासाठी काही डाव टाकले असतील. तसाच डाव त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील सांगोला विधानसभेच्या मतदार संघात टाकला आहे.

वास्तविक महाविकास आघाडीच्या जागा वाटपात सांगोल्याची जागा ही तशी शेकापच्या वाट्याची. शेकाप हा राष्ट्रवादी काँग्रेसचा मित्रपक्ष. या खेपेससुद्धा इथली जागा शेकापलाच सुटणे सहाजीकच. पण या मतदार संघासंबंधी झालं ते वेगळं. हे काही 'घडलं-बिडलंय' नव्हे नव्हे, घडवलंय किंवा डाव टाकला तो बारामतीकर शरद पवार यांनी.सांगोल्याची शेकापची जागा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाला पवारांनीच सोडून टाकल्याचा बोलबाला आहे. त्याला कारणांची पुस्तही जोडली जात आहे. एक तर शेकापच्या इथल्या एका जागेवर स्वर्गीय आमदार गणपतराव देशमुख यांचे नातू डॉ. बाबासाहेब देशमुख आणि डॉ. अनिकेत देशमुख हे दोघे दावा करीत आहेत. उमेदवारुन घेण्यावरुन मागे हटयाला कोणीच तयार नाही. त्यातून मोठा पेच निर्माण झाला आहे. कोण्या एकाला उमेदवारी द्यायची म्हटलं तर दुसऱ्याची नाराजी. या नाराजीचा पुन्हा फटका बसणार. यावर रामबाण उपाय शरद पवारांनी शोधून इथली जागाच उद्धव ठाकरे यांना सांगून शिवसेनेला देऊन टाकली.शेकापच्या उमेदवारीचा प्रश्न निकाली निघाल्यानंतर डॉ. बाबासाहेब किंवा डॉ. अनिकेत या दोघांपैकी कोणीतरी अपक्ष उभा ठाकेल. नशीबाच्या साथीनं निवडून आल्यास महाविकास आघाडीत संबंधितास घेता येईल, हा शरद पवारांचा डाव. सांगोल्यातील या डावाचाच दुसरा पार्ट म्हणजे उद्धव ठाकरे यांना सांगून माजी आमदार दीपक साळुंखे यांना त्यांच्या शिवसेना पक्षाची उमेदवारी देण्यास भाग पाडणे. आमदार शहाजी पाटील आणि डॉ. देशमुख यांच्यासोबत लढताना महाविकास आघाडीला असलेलं जनमताचं समर्थन आणि मतांची विभागणी या आधारे दीपक साळुंखे हे निवडून आले तर ठाकरे सेना म्हणजे महाविकास आघाडीच्या वळचणीलाच ते येणार. एकूणच शरद पवार यांनी शेकापच्या उमेदवारीवरचा पर्याय आणि आपले विश्वासू दीपक साळुखे यांना आमदारकीची संधी असा लोकसभेच्या सांगली पॅटर्नप्रमाणे डाव टाकला.

### शरद पवार हेच दीपकआबांचे सूत्रधार

सांगोल्याची विधानसभा लढण्यासाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देणं, उद्धव ठाकरे शिवसेनेत प्रवेश करुन लगोलग विधानसभेची उमेदवारी घेणं या दीपक साळुंखेंच्या सगळ्या राजकीय घडामोडींचे सुत्रधार शरद पवार हेच आहेत, त्यांनी साळुंखे यांच्यासाठी पडद्याआडून खूप काही शिजवल्याचा बोलबाला आहे.

## राऊतांच्या विरोधात सोपलच !

### आखाडा कायम; पक्ष कळणार आज



✔ **सोलापूर :** बहुचर्चित बार्शीच्या महासंग्रामावर आमदार राजेंद्र राऊत विरुद्ध माजी आमदार दिलीप सोपल अशीच कडवी निकाराची झुंज होईल, हे रविवारी स्पष्ट झालं. सोपल यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन आपण लढण्यावर ठाम आहोत, असं प्रसारमाध्यमांना सांगितलं. बार्शीतून लढण्यासंबंधी सोपल यांनी शरद पवार अन् उद्धव ठाकरेंच्या कानात गुजगोष्टी केल्या.तथापि, ते कोणत्या पक्षाच्या चिन्हावर लढणार? यासंबंधीचा फैसला सोमवारी (ता.२१) कळणार आहे.

बार्शीचे माजी आमदार दिलीप सोपल यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. बार्शीतून मी इच्छुक असल्याचे सोपल म्हणाले. मी शरद पवारसाहेबांचा कार्यकर्ता म्हणून १९७६ पासून काम करत असल्याचे सोपल म्हणाले. तिनही पक्षाचे वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील तो मला मान्य असेल असंही त्यांनी सांगितलं.

निवडणुकीला सामोरं जाताना थोरामोठ्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी मी आलो असल्याचे दिलीप सोपल म्हणाले. तिनही पक्षाचे वरिष्ठ जे निर्णय घेतील तो मला मान्य असेल असंही त्यांनी सांगितले. दरम्यान, मनोज जरांगे पाटलांबददल खूप मोठी सहनभूती असणारा बार्शी मतदारसंघ आहे. मी सुरुवातीपासून त्यांना पाठींबा दिला आहे. ते मला पाठींबा देतील का? हे मी सांगू शकत नाही असंही सोपल म्हणाले. मात्र, त्यांच्या उमेदवारांचा नक्कीच फटका बसू शकतो असेही सोपल म्हणाले.

## 'मविआ'चे पत्ते आज होणार ओपन!

### सोलापूर जिल्ह्यात टशन अन् टेन्शन!

✔ मुंबई-सोलापूर/प्रतिनिधी

'आमचं सगळं ठरलंय' असं ठासून सांगणाऱ्या महाविकास आघाडीची जागा वाटपासंबंधी संयुक्त पत्रकार परिषद सोमवारी (ता.२१) मुंबईत होत आहे. या पत्रकार परिषदेतून जागा वाटपाचे पत्ते ओपन होणार आहेत. दरम्यान, सोलापूर जिल्ह्याच्या दृष्टीने या पत्रकार परिषदेकडे केवळ महाविकास आघाडीच नव्हे, तर महायुतीचं लक्ष लागलं आहे.

विशेषत्वे, शरद पवारांनी सोलापूर जिल्ह्यातील जागेसंबंधी अनेक डाव टाकले आहेत, त्यांच्या डावांचा हाबडा नेमका कोणाला बसणार? जागा वाटप मनासारखं नाही झाल्यास कोण्या इच्छुकाला विधानसभा लढण्याच्या मनसूब्यावर आपसूकच पाणी सोडावं लागणार? हे पाहणं अत्यंत महत्त्वाचं आहे. त्यामुळं सोमवारचा दिवस विधानसभेच्या उमेदवारींसाठीच्या जागा सुटण्याच्या टप्यावर अत्यंत महत्त्वाचा ठरणारा आहे.

शरद पवारांनी माळशिरस, करमाळा, माढा, पंढरपूर, मोहोळ या मतदार संघांवर डोळा ठेवत सोलापूर शहर दक्षिण विधानसभेच्या जागेवर थेट धर्मराज काडादींना काम करण्यास सांगितल्याची बोलबाला आहे. सोलापूर शहर उत्तरची जागादेखील आपल्या गटाकडं घेण्यासंबंधी शरद पवारांनी काही शिजवल्याचं कळतं.

वास्तविक पंढरपूर आणि सोलापूर दक्षिणची जागा काँग्रेसकडे आहे. या जागा आपल्या गटाकडे सोडवून घेताना शरद पवार यांनी कोणता चमत्कार केला? या संबंधित जागांच्या बदल्यात कोणत्या जागा काँग्रेसला दिल्या? यासंबंधींचं मोठं औत्सुक्य आहे. सोलापूर शहर उत्तरची जागादेखील शरद पवार यांनी सोडवून घेतल्याची माहिती समोर येत आहे, त्याबद्दलसुद्धा प्रचंड कुतुहल केवळ त्या मतदार संघातच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यात आहे. मुळच्या काँग्रेस आणि शिवसेनेच्या जागा शरद पवार गटाला देताना उद्धव ठाकरे शिवसेना आणि काँग्रेसने इतर ठिकाणच्या कोणत्या जागा घेतल्या यासंबंधींची उत्सुकता आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे महाविकास आघाडीकडून सोमवारी जागा वाटप जाहीर झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील ११ मतदार संघामध्ये कोणत्या पक्षामध्ये आणि कशी लढत होईल, याचं चित्र स्पष्ट होणार आहे.




### इच्छुकांकडून देव पाण्यात

'अभी नही तो कभी नही' असा नारा देत प्रचंड महत्त्वाकांक्षेपाटी आमदारकी लढण्यासाठी सज्ज असलेल्या इच्छुकांनी उमेदवारीसाठी प्रचंड लॉबिंग केलंय. गॉडफादरांची मनधरणी करता करता बेजारी करुन घेतली. गॉडफादरांचं कार्यालयं आणि निवासस्थान यांच्या पायऱ्या झिजवल्या आहेत. एवढं करुन मतदार संघाची जागा आपल्याच पक्षाकडं राहावी आणि उमेदवारीची वरमाला आपल्याच गळ्यात पडावी, यासाठी आघाडीच्या सर्वच प्रबळ इच्छुकांनी अक्षरश: देव पाण्यात ठेवले आहेत.

### शिंदे पिता-कन्येची समजेल भूमिका

सुरुवातीला जिल्ह्यातील ११ विधानसभेच्या मतदार संघावर खासदार प्रणिती शिंदे यांना कॉग्रेसतर्फे दावा केला होता. पुढे मात्र काँग्रेसच्या जागा वाटपावर प्रणिती शिंदे यांनी कधीच वाच्यता केली नाही. शिवाय सुशीलकुमार शिंदेदेखील जागा वाटपावर कधीच बोलले नाहीत. तेव्हा शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी जागा वाटपात जी भूमिका घेतली त्याबद्दल शिंदे पिता-कन्येचं काय समर्थन असू शकतं? याचा उलगडादेखील सोमवारी होणार आहे.